१०८५

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ३१(४) ] मंगळवार, डिसेंबर २१, २०१०/अग्रहायण ३०, शके १९३२ [ पृष्ठे ७, किंमत रुपये २६.००

## असाधारण क्रमांक ५०

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

## अनुक्रमणिका

**सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२.—** महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. — पृष्ठे १-७

दिनांक २१ डिसेंबर २०१० रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

ह. बा. पटेल,<br>
सचिव,<br>
महाराष्ट्र शासन,<br>
विधी व न्याय विभाग.

---

## सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " महाराष्ट्र शासन राजपत्रात " दिनांक २१ डिसेंबर २०१० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— १९५६ चा मुंबई ४७. १९५६ चा मुंबई ४८. १९५६ चा मुंबई ४९. १९७८ चा महा. ८.

प्रकरण एक

**प्रारंभिक**

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) अधिनियम, २०१० असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १ एप्रिल २०१० पासून अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

प्रकरण दोन

**महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम याची सुधारणा**

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम ३ ची सुधारणा. २. महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश "सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ मध्ये, "रु. ५,०००" या मजकुराऐवजी, "रु. १०,०००" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९५६ चा मुंबई ४७.

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम ४ ची सुधारणा. ३. सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम ४ मधील, पोट-कलम (१) मध्ये, "रु. २,५००" या मजकुराऐवजी, "रु. १०,०००" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

४. सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम ७अ मध्ये,— सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम ७अ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (३) मध्ये, "रु. ८,०००" या मजकुराऐवजी, "रु. १२,०००" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) पोट-कलम (४) मधील, खंड (क) मध्ये, "रु. ८,०००" या मजकुराऐवजी, "रु. १२,०००" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

५. सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या संपूर्ण कलम ८ मध्ये, "तीस हजार किलोमीटर" हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह आला असेल त्या त्या ठिकाणी, "पन्नास हजार किलोमीटर" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल. सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम ८ ची सुधारणा.

६. सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम १० मध्ये, "रु. ४,६००" या मजकुराऐवजी , "रु. ९,२००" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १० ची सुधारणा.

७. सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम १० नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४७ यामध्ये कलम १०-१अ समाविष्ट करणे.

"१०-१ अ. उप सभापती व उपाध्यक्ष यांस दरवर्षी प्रत्येकी तीन लाख रुपये इतका आतिथ्य भत्ता म्हणून स्वाधीन करण्यात येईल.". उप सभापती व उपाध्यक्ष यांना द्यावयाचा आतिथ्य भत्ता.

८. सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम १० अ मध्ये, "रु. २००" या मजकुराऐवजी , "रु. ५००" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १०अ ची सुधारणा.

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम २ ची सुधारणा.

९. सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम ११ मध्ये, "रु. २,५००" या मजकुराऐवजी, "रु. १०,०००" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## प्रकरण तीन

## महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम याची सुधारणा

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ३ ची सुधारणा.

१०. महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश " मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ मध्ये,— १९५६ चा मुंबई ४८.

(क) "रु. ५,०००" या मजकुराऐवजी, "रु. १०,०००" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) "रु. ४,६००" या मजकुराऐवजी, "रु. ९,२००" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ४ ची सुधारणा.

११. महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम याच्या कलम ४ मध्ये, पोट-कलम (१) मधील, "रुपये २,५००" या मजकुराऐवजी ,"रु. १०,०००" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ७ ची सुधारणा.

१२. महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम याच्या कलम ७ मध्ये पोट-कलम (१) मधील "रुपये २,५००" या मजकुराऐवजी ,"रु. १०,०००" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ८अ ची सुधारणा.

१३. मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम ८अ मध्ये, "रुपये २००" या मजकुराऐवजी, "रु. ५००" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम १०अ ची सुधारणा.

१४. मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम १०अ मधील,—

(क) पोट-कलम (३) मध्ये, "रु. ८,०००" या मजकुराऐवजी ,"रु. १२,०००" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) पोट-कलम (४) मधील, खंड (अ) मध्ये, "रु. ८,०००" या मजकुराऐवजी, "रु. १२,०००" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१५. मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या संपूर्ण कलम १०ब मध्ये, "तीस हजार किलोमीटर" हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह आला असेल त्या त्या ठिकाणी, "पन्नास हजार किलोमीटर" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल ; सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम १०ब ची सुधारणा.

प्रकरण चार

## महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम याची सुधारणा

१९५६ चा मुंबई ४९ १६. महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश "विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ मधील,— सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ३ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (१) मध्ये "रु. २,०००" या मजकुराऐवजी, "रु. ८,०००" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२) मध्ये "रु. १,५००" या मजकुराऐवजी, "रु. ३,०००" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१७. विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम ४ मध्ये "रु. ५००" या मजकुराऐवजी, " रु. १,०००" हा मजकूर दाखल करण्यात येईल ; सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ४ ची सुधारणा.

१८. विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम ५ मधील, पोट-कलम (१अ) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :— सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ५ ची सुधारणा.

"(१अ) पोट- कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही सदस्याला वर्षाच्या संपूर्ण कालावधीत राज्यातील कोणत्याही विमानतळावरून कोणत्याही शहरांपर्यंत किंवा नगरांपर्यंत किंवा कोणत्याही शहरांपासून किंवा नगरांपासून कोणत्याही विमानतळापर्यंत एकूण बत्तीस वेळा एकेरी, आणि राज्यातील कोणत्याही विमानतळापासून राज्याबाहेर असलेल्या भारताच्या हद्दीतील कोणत्याही विमानतळापर्यंत व तेथून एकूण आठ वेळा एकेरी विमान प्रवास करता येईल.

**स्पष्टीकरण.**— या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, "राज्यातील कोणतेही विमानतळ" या संज्ञेत त्याच्या निवासस्थानापासून सर्वांत जवळ असलेल्या राज्याबाहेरील विमानतळाचा अंतर्भाव असेल.".

१९. विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम ६ मध्ये,— सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ६ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (४) मध्ये " रु. २५,००० " या मजकुराऐवजी, " रु. ४६,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (५) मध्ये " रु. ७,५०० " या मजकुराऐवजी, " रु. १०,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## प्रकरण पाच

## महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ याची सुधारणा.

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ३ ची सुधारणा.

२०. महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ (यात यापुढे, या प्रकरणांत, ज्याचा निर्देश "महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ मध्ये, " रु. ५,०००" या मजकुराऐवजी, " रु. १०,०००" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९७८ चा महा. ८

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ३अ ची सुधारणा.

२१. महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम यच्या कलम ३अ मध्ये, " रु. २००" या मजकुराऐवजी, " रु. ५००" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ४ ची सुधारणा.

२२. महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम ४ मधील, पोट -कलम (१) मध्ये, " रु. २,५००" या मजकुराऐवजी, " रु. १०,०००" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ यामध्ये कलम ४अ समाविष्ट करणे.

२३. महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम ४ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

विरोधी पक्षनेत्याला द्यावयाचा आतिथ्य भत्ता.

" ४अ. प्रत्येक विरोधी पक्षनेत्यास दरवर्षी तीन लाख रुपये इतका आतिथ्य भत्ता म्हणून स्वाधीन करण्यात येईल.".

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ७ ची सुधारणा.

२४. महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या संपूर्ण कलम ७ मध्ये, " तीस हजार किलोमीटर " हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह आला असेल त्या त्या ठिकाणी, " पन्नास हजार किलोमीटर " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल.

२५. महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम ९ मधील ,— सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ९ ची सुधारणा.

(क) पोट -कलम (३) मध्ये, " रु. ८,००० " या मजकुराऐवजी, " रु. १२,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (४) मधील , खंड (अ) मध्ये, " रु. ८,००० " या मजकुराऐवजी, " रु. १२,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNIROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.